# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट २१४-२२** **दिनांक १५/०७/२०२२**

## पर्यटन स्थळांबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये पोलीस उप आयुक्त, विरार यांचे मनाई आदेश जारी.

मान्सुन कालावधीमध्ये निसर्गाचा तसेच धबधबे, तलाव, धरणे व समुद्र किनारी आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. त्यामुळे सदर ठिकाणी पर्यटकांची जिवीत व वित्त हानी होवु नये किंवा पर्यटकांचे जिवन धोक्यात येवु नये याकरीता श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील **परिमंडळ-३, विरार कार्यक्षेत्रातील विरार, पेल्हार, मांडवी, नलासोपारा, अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीतील सर्व धबधबे, तलाव, धरणे व इतर पर्यटनस्थळांचे १ कि.मी. परिसरात व समुद्रकिनारी** खालील बाबींकरीता प्रतिबंधात्मक आदेश लागु केलेले आहेत.

१. पावसामुळे वेगाने वाहनाऱ्या पाण्यात उतरणे, खोल पाण्यात उतरणे अथवा त्यामध्ये पोहणे.

२. धबधब्याच्या उगमस्थानी जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे.

३. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे इत्यादी ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे.

४. पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्यांचे परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतुक करणे, अनधिकृत मध्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे.

५. वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे.

६. वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतुकीस परिणाम होईल अशा प्रकारे वाहन चालविणे.

७. वाहनांची ने-आण करताना बेदकारपणे वाहन चालवुन इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे.

८. सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टीकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टीकचे साहित्य उघड्यावर इतरत्र फेकणे.

९. सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगलटवाळी करणे, महिलांसोबत असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा त्यांचे मनास लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे.

१०. सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डी.जे.सिस्टीम वाजविणे, गाडीमधील स्पीकर वाजवणे व त्यामुळे ध्वनी प्रदुषण करणे.

११. ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदुषण होईल अशी कोणतीही कृती करणे.

सदर आदेशाचा कालावधी हा दिनांक १५/०७/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक २९/०७/२०२२ रोजीचे २३.५९ वाजे पावेतो लागु असणार आहे.

---ooo---